॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

प. पू. रामराय गोविंद केळकर

तथा

श्री दासराम महाराज रचित

# राम दास बोध



परम पूज्य
रामराय गोविंद केळकर
तथा
दासराम महाराज
सांगली.

# आशीर्वाद

भगवान श्री सद्गुरु श्री तात्यासाहेब महाराज कोटणीस यांच्या परमकृपेने अगदी लहानपणी माझे हातून लिहिला गेलेला "श्री राम दास बोध" आमचे परमप्रिय बजरंग रामराव हडदरे उत्स्फूर्तपणे प्रकाशित करीत आहेत ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे.

हा श्री राम दास बोध म्हणजे रामाने केलेला बोध नव्हे तर दासरामास झालेला बोध आहे. यादृष्टीने या विषयाकडे आपण पहावे. हे श्री सद्गुरुंचे बोधामृत आहे, की जो बोध भेटला की साधन करावे लागत नाही ते सहज-साधन होते. आणि तो साधक सहज लीलया उध्दरुन जातो अशी स्थिती आहे. ती या सद्गुरु बोधाने सर्व साधकांना प्राप्त होईल असा माझा भगवान श्री सद्गुरु श्री निंबरगीकर महाराज यांचे कृपेने विश्वास आहे. या ग्रंथास श्री महाराजांचा आशीर्वाद आहे.

हा आशीर्वाद माझ्यासह सर्व साधकांना प्राप्त व्हावा अशी भगवान श्री सद्गुरु श्री निंबरगीकर महाराज, भगवान श्री सद्गुरु श्री तात्यासाहेब महाराज कोटणीस व माझे पितृदेव श्री मामा महाराज या त्रैमूर्तीचे चरणी प्रार्थना आहे.

शुभं भवतु !

सांगली
१८-७-९८

-दासराम
(राम गोविंद केळकर)

# मनोगत

आमचे महाराज प.पू. श्री. रामराय गोविंद केळकर तथा श्री. दासराम यांनी त्यांच्या वयाच्या ९व्या वर्षी १३ समास एकूण ओव्या १६९ असा ''श्री राम दास बोध'' हा ग्रंथ लिहिला. भगवान श्री सद्गुरु श्री तात्यासाहेब महाराज कोटणीस यांच्या कृपाशीर्वादाप्रमाणे श्री दासराम महाराज हे वयाच्या पाचव्या वर्षापासून कीर्तन करु लागले. वयाच्या ७व्या वर्षी त्यांनी ''गुरुचा परवा असावा वरती ।'' हे प्रथम पद केले व ९व्या वर्षी हा ''श्री राम दास बोध'' ग्रंथ लिहिला व यानंतर अनंत अध्यात्मिक वाङ्मय त्यांचे हातून झाले. ही सर्व श्री महाराजांची अगाध करणी आहे.


यापैकी ''श्री राम दास बोध'' हा ग्रंथ आपल्यापुढें ठेवताना मला अतिशय आनंद होत आहे. श्री दासराम महाराजांनी त्यावेळी या ग्रंथाची सुबक व सुंदर अक्षरात प्रत तयार करण्याचे काम श्री. कानिटकर बंधूपैकी ह. भ. प. गणपतराव कानिटकर यांचेकडे सोपविले. श्री. कानिटकर यांनी सुंदर प्रत तर तयार केलीच आणि या ग्रंथाचे महात्म्य अर्पण समासात सांगून ठेवले. तो अर्पण समासही या ग्रंथाचे शेवटी दिला आहे.

असा हा ''श्री राम दास बोध'' अत्यंत पवित्र असा ग्रंथ पोथीच्या स्वरुपात मुद्रित केला आहे. मुद्रण प्राजक्त प्रिंटींग प्रेसचे मालक श्री. प्रकाश आपटे यांनी केले आहे. प्राजक्तला धन्यवाद. तसेच हा ग्रंथ पूर्ण होण्यास श्री. चंद्रशेखर केळकर व श्री. वामनराव सहस्त्रबुद्धे या आमच्या गुरु बंधूचे आम्हाला मोलाचे सहकार्य लाभलेले आहे.

श्री दासराम महाराजांच्या अमृत महोत्सवाच्या वर्षात हा ग्रंथ प्रकाशित करण्याची संधी श्री महाराजांचे कृपेने प्राप्त झाली ही भाग्याची गोष्ट आहे.

आता श्री महाराजांचे चरणी एकच प्रार्थना आहे, ही झालेली सेवा गोड करुन घ्यावी व आम्हा सर्व साधकांना समाधान लाभावे एवढी प्रार्थना करुन येथेच थांबतो.

सांगली
१५-८-१९९५



बजरंग रामराव हडदरे

## अनुक्रमणिका


| समास | | ओव्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | गणेश सरस्वती स्तवन | १२ |
| २ | सद्गुरु स्तवन | ११ |
| ३ | सत्य ज्ञान श्रवण | १३ |
| ४ | साक्षात्कार खूण प्रचिती | १३ |
| ५ | साक्षात्कार प्रचित खूण साधन | १२ |
| ६ | सत्यमार्ग कथन | ११ |
| ७ | ध्यान श्रवण | १२ |
| ८ | गुरु महिमान | ११ |
| ९ | नामस्मरण महिमान | १८ |
| १० | सत्संगती वर्णन | १२ |
| ११ | हृद्गद वर्णन | १६ |
| १२ | संन्यस्तवृत्ती निरुपण | १२ |
| १३ | संन्यस्तवृत्ती निरुपण | १६ |
| | एकूण ओव्या | १६९ |
| | राम-दास बोध ग्रंथ महात्म्य ओव्या | ११ |


॥ श्री गणेशायनमः ॥

आधी वंदू गणनायक । जो का विघ्नांचा हारक ।
आनंद मोदक दायक । जो का असे ॥१॥

जो मनीची इच्छा पुरवी । जो अज्ञाना सुविद्या देई ।
मोक्ष प्राप्तीचिये सोई । दावितसे जो साधका ॥२॥

त्या गणेश कृपेचा रजःकण । हृदयी प्रवेशता जाण ।
मन जातसे वेडाऊन । आत्मछंदे ॥३॥

जो ॐकार रुपे प्रचीतीसी येई । जो इंद्रियांचा नियामक पाही ।
ज्याची कृपा होता पाही । सर्वची घडे ॥४॥

तये ठायी जावोन । मोया वंदीयेले चरण ।
माझे मनीची इच्छा जाण । सांगितली देवासी ॥५॥

की राम दास बोध । माझे मनी प्रगटावे हृद्गद ।
तेची करोनी दावावे विशद । भूतमात्री ॥६॥

जेणे योगे तुटतील बंधन । जेणे होय देव भेटी जाण ।
ऐसा काही मार्ग आपण । विशद करोनी सांगावा ॥७॥

तेची मी लिहेन साचार । जेणे मुक्त होय चराचर ।
मज लागी भेटे रघुवीर । जाण देवा ॥८॥

ऐसे प्रार्थिता देवासी । देवे सांगितले मजसी ।
आता सांगेन ते परियेसी। हृदयी कोरोनी ठेविजे ॥९॥

तुझिये मनातील हेत । पूर्ण होईल निश्चित ।
ऐसा वर होता प्राप्त । दास झाला सुखसंपन्न ॥१०॥

तेथोनि शारदेचे चरणी लागली । माझा मनिचा हेत बोलिली ।
तेथोनि आशिर्वचन घेवोनि आली। सद्गुरु सदनासी जाण पा ॥११॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
गणेश सरस्वती स्तवननाम । प्रथमः समासः ॥१२॥



॥ श्री गणेशायनमः ॥

आता वंदू सद्गुरुवर । जे आम्हा अनाथांचे माहेर ।
ज्यांचे दर्शने चराचर । पावन होती ॥१॥

जे अत्यंत उदार । भक्ता रक्षिती धुरंधर ।
लाड पुरविती साचार । बालकांचे ॥२॥

जे का जगाचे मायबाप । ज्यांचे दर्शने हरती त्रिविधताप ।
ज्यांचे कृपे पुण्यपाप । भस्म होय ॥३॥

त्या उदारासि मी माझा हेत । कथिला असेजी समस्त ।
आशिर्वाद दिधला मनोरथ । पूर्ण होतील मम बाळा ॥४॥

ऐसा वर ऐकिता जाण । दास झाला सुखसंपन्न ।
आता भयाचे कारण । उरलेचि नाही ॥५॥

आता मी जाहलो निर्भय । इच्छा पूर्ण करील गुरुमाय ।
आता मी न करी ते काय । सांगावे जी मजलागी ॥६॥

आता जे मम अंतरी । सद्गुरु बोध करतील निर्धारी ।
तेची लिहीन ठेवीन साचारी । सकळ जना कारणे ॥७॥

ऐसा बोध जो मनी घेईल । तेची मुक्त पदा जाईल ।
काळावरी मात चालवील । गुरुकृपे करोनी ॥८॥

अखंड सप्रेमे सद्गुरुचरण । वंदिती सत्य साच जाण ।
त्याचे फळ मजला संपूर्ण । सद्गुरुंनी बोधरूपे दिधलेसे ॥९॥

ऐसा भक्ती प्रेमाचा महिमा । काय द्यावी यासी उपमा ।
नेवोनि बैसवीता मूळ धामा । ऐसे सामर्थ्य जयांचे ॥१०॥

इतीश्री राम दास बोधे मनोमानसी संवादे ।
सद्गुरु स्तवननाम द्वितीयः समासः ॥११॥



॥ श्री गणेशायनमः ॥
श्रोती व्हावे सावधान । आता सांगती खरे ज्ञान ।
जेणे प्रगटे भगवान । हृदयांतरी ॥१॥

शरण जावे श्रीगुरुसी । सांगड बांधोनी भक्तीसी ।
हरीनाम वाचे म्हणसी । तरीच भवसागरी तरशील ॥२॥

गुरुगम्य जाणोनि ध्यावे । मी कोण हे ओळखावे ।
देव कोण उमगावे । या नाव ज्ञान ॥३॥

नको यज्ञ नको दान । करावे पुराणश्रवण ।
जेणे होय आत्मज्ञान । जाणबापा ॥४॥

करावे मनाचे आसन । करावे देहाचे कांडण ।
करावे भक्तीचे घुसळण । अरे मना ॥५॥

सहालागी मारावे । रघुपतीसी स्मरावे ।
भव सागरातोनि तरावे । जाण बापा ॥६॥

वासनेसी त्यागावे । दुर्बुध्दीसी छेदावे ।
मनामाजी स्मरावे । रघुपतीसी ॥७॥

संसार सागरी तरणे । हे तो नोहे स्वल्प जाणे ।
परंतू हरीनामस्मरणे । तरशील बापा ॥८॥

नको व्रत नको कर्म । मना जपे राम नाम ।
तेणेचि तू विश्रामधाम । पावसी पा ॥९॥

महामायेचे निवारण । हरी भक्ती करी जाण ।
भक्ती योगे चित्त पावन । होईजे पा ॥१०॥

गुरुकृपा जरी झाली । तीच आणावी मुक्तवेली ।
कृपेलागी नाम बोली । सर्वकाळ ॥११॥

पाजळल्या आत्मज्योती । पाहता होय आत्मप्राप्ती ।
याची पहावी प्रचीती । रामनामी ॥१२॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
सत्यज्ञान श्रवणनाम । तृतीयः समासः ॥१३॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । साक्षात्कार प्रचीत खूण ।
की जे देखिलिया जाण । भवबंधन उरेना ॥१॥

त्रिगुणात्मकाच्या गतीत । पतीतपावन रघुनाथ ।
नामस्मरणे येई प्रचीत । सज्जनासी ॥२॥

प्रथम पाजळलेल्या ज्योती । मग पाहता दिसती मोती ।
परी साक्षात्कारा नामी प्रीती । धरावी गा ॥३॥

मग पाहता दिसेल चांदणी । आणि नवरत्नांची खाणी ।
तेज सुंदर चहुकोनी । दिसेल गा ॥४॥

विजेचा घडघडाट । पर्जन्याचा घनदाट ।
कस्तुरीचा घमघमाट । अनुभवासी येतसे ॥५॥

नरदेही ये प्रचीती । त्यासी मुक्तद्वार म्हणती ।
नरदेहाचे महात्म्य किती । किती म्हणोनी वर्णावे ॥६॥

आपुले देवाचे पहाता नगर । शिपाई फिरती चौफेर ।
आनंदाने रंगले नगर । पाहता जाण कळो येई ॥७॥

दिसे पताकांचा भार । आणीक सुमनांचा हार ।
श्रेष्ठ तेज ते अपार । साधका दिसे ॥८॥

माणिकांचे घोस लोंबले । मोतीचूर फेकीयेले ।
आनंदे दशविध नाद ऐकिले । मंजुळसे ॥९॥

तेज फाकिले अपार । बारावाटे पळती चोर ।
जेथे चालिला जागर । तेथे कशास रहाती ते ॥१०॥

मग जो होय सूख प्राप्ती । यालाच बोलती मुक्ती ।
हरे राम जे वाचे म्हणती । तेची थोर ॥११॥

मग दिसे प्रकाश साजिरा । नंतर दिसेल जाण हिरा ।
मग त्या शारंगधरा । धरावेगा ॥१२॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
साक्षात्कार खूण प्रचीत नाम । चतुर्थः समासः ॥१३॥



॥ श्री गणेशायनमः ॥

आता ऐका श्रोते जन । साक्षात्कार प्रचीतखूण साधन ।
ते एकाग्र चित्ते श्रवण । करावेगा ॥१॥

मन आसन करावे । चित्त चैतन्यी लावावे ।
राम स्वरुपी भरावे । स्वस्वरुपी ॥२॥

दशेंद्रिये होती लीन । श्रीराम स्वरुपी जाण ।
वृत्ती तयामाजी विरोन । एकाकार होतसे ॥३॥

जिव्हा रंगली आत्मवाणी । नेत्र पाहती अध्यात्मखाणी ।
कान ऐकती वेद प्रवाणी । ऐसे नामी होतसे ॥४॥

सहांचे कूट केले । राम स्वरुपी विरोनी गेले ।
तेथे हे नाद श्रवण केले । हरे राम । हरे राम ॥५॥

हे नाम घ्यावे वैखरीने । मागोनि घ्यावे मध्यमेने ।
नंतर घ्यावे पश्यंतीने । परेने गा ॥६॥

हे नाम घ्यावे चालता । हे नाम घ्यावे बोलता ।
कामधंदा करिता करिता । सर्वकाळ ॥७॥

हे नाम कसेही घ्यावे । परंतू ते जीवेभावे ।
अंतरामाजी घ्यावे जाणावे । तरिच पावावे मोक्षपद ॥८॥

आत्मपदी जो गेला । त्याचा देहभाव आटला ।
तो जाणावा थोर भला । तोही लोकी ॥९॥

त्यासी नाही पुनर्जन्म । ज्यासी जोडिले विश्रामधाम ।
ज्याचे मुखी रामनाम । तोची थोर ॥१०॥

मार्गी आहेत बहुत काटे । ते सारोनी चाल वाटे ।
मग प्रभू श्री परमात्मा भेटे । तुजलागी ॥११॥

इतिश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
साक्षात्कार प्रचीतखूण साधन नाम । पंचमः समासः ॥१२॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । करीन सत्यमार्गाचे कथन ।
जेणे योगे भगवान । संतुष्ट होय ॥१॥

योग यागादीक जाण । कर्म जाण जे का गहन ।
ते तो विधियुक्त जाण । चुकता अपाय ॥२॥

भोजनात फाटा करावा । निद्रेत फाटा करावा ।
आणि योग सांभाळावा । तोचि योगी ॥३॥

योगात नानाविध आसन । ते नोहेची साधन ।
ते सर्वा परी कठीण । नाम सोपे ॥४॥

म्हणोनी हरीनामस्मरा । हरीरुप मनी धरा ।
तेणेचि पावसील पैलतीरा । बा मना ॥५॥

योग मार्ग हा चुकला । भलत्याच मार्गी गेला ।
परी जेणे मार्ग हा साधला । तोचि मुक्त ॥६॥

रामनाम हाची योग । बाकी सर्वची वियोग ।
हा जेणे साधिला योग । तोचि भला ॥७॥

हे तो नाही अवघड । परी जाणिजे सवघड ।
येणे आड आलेल्या मायेची दरड । कोसळोनी जाय ॥८॥

ऐसा योग साधिसी जरी । तरीच तरसील भवसागरी ।
म्हणसी राम कृष्ण हरी । तरी तू योगी ॥९॥

आधी घालावे आसन । करोनिया एकाग्र मन ।
पाठीचा कणा ताठ करोन । नासाग्री दृष्टी लावावी ॥१०॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
सत्यमार्ग कथन नाम । षष्ठः समासः ॥११॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । कोणते करावे जी ध्यान ।
गुरु कैसा असावा जाण । एकचित्ते ॥१॥

पाहिले का बक ध्यान । बैसला डोळे मिटोन ।
जणू काय तपस्वी जाण । आपणासी वाटतसे ॥२॥

ऐशिया परीचे साधन । डोळे मिटोनीया जाण ।
मनी संकल्प विकल्प ठेवून । करु नये कदाही ॥३॥

ऐसे करिता साधन । नोहे देव भेटी जाण ।
गुरुकृपे घेसी खूण । तरीच आत्मपद कळेल ॥४॥

ऐसा हा मनोरुपी बगळा । याची न जाणावी कळा ।
परी साधूसंतांची कळा । जाणावी गा ॥५॥

जाणे राजहंस गुरु । तो हा परम सद्गुरु ।
दूध पाणी वेगळे करु । मायाब्रह्म निवारण ॥६॥

माया आणि ब्रह्म जाणी । वेगळे करोनि दावी चक्रपाणी ।
जाणा तैसा हा संतमणी । हणमंत पांडुरंग कोटणीस ॥७॥

ऐशा संतासी शरण जावे । गुरुगम्य विचारावे ।
ते अंतरी ठसौनि ध्यावे । पूर्ण ब्रह्म ॥८॥

नको नको बक ध्यान । ब्रह्म अंतरी ध्यावे ठसवून ।
तरिच होसी जगी धन्य । जाणिजे पा ॥९॥

हा मार्ग परम सुलभ । पण जनासी जाहला दुर्लभ ।
परीतो गुरुकृपे सुलभ । होतसे ॥१०॥

म्हणोनी जावे गुरुला शरण । तोचि जगी मुक्त जाण ।
येर कर्मे ती कठीण । नेणसी बापा ॥११॥

इतीश्री राम दास बोधे । मनो मानसी संवादे ।
गुरु कोण कैसे ध्यान श्रवण नाम । सप्तमः समासः ॥१२॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । सांगेन करावे स्मरण ।
जेणे चुके जन्ममरण । पतीत अशा जीवांचे ॥१॥

घालोनी मनीचे आसन । धरोनिया अंतर मौन ।
अंतराक्षी माळ जाण । धरावी गा ॥२॥

ऐसे करिता जाण ध्यान । मना वाटेल समाधान ।
देखोनिया ब्रह्म पूर्ण । जाणिजे बापा ॥३॥

अंतरी न करिता स्मरण । जरी करशील बक ध्यान ।
तरी तुझे व्यर्थ जीवित्व जाण । नाम नसे मुखी का ॥४॥

नको नको बक ध्यान । याने आहे जन्ममरण ।
म्हणोनिया करा स्मरण । भगवंताचे ॥५॥

मार्ग आहे बहुत सोपा । याने चुकतील जन्म खेपा ।
म्हणोनिया नाम जपा । अखंडीत ॥६॥

साधुसंतांचे चरण । धरीता मुक्त होशील जाण ।
सांगितलेले भजन । करी मना ॥७॥

गुरुला जाता शरण । तात्काळ आत्मपद प्राप्ती जाण ।
पुन्हा नाहीरे बंधन । या जीवासी ॥८॥

जीवशिवाची ऐक्यता । तेथे मोक्ष रे तत्वता ।
राम नाम मनी ध्याता । ऐक्यता होय ॥९॥

मना माजी आत्मपण । ठसविता मुक्तची आपण ।
वाऊगाची भ्रम जाण । सोडोनि द्यावा ॥१०॥

इतीश्री राम दास बोधे । मनो मानसी संवादे ।
गुरुमहीमान वर्णन नाम । अष्टमः समासः ॥११॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । नामस्मरणाचे महिमान ।
हरिभक्ती गुणवर्णन । मन स्थीर करोनी ॥१॥

आता एक भक्ती करी । हरी चरण दृढ धरी ।
तेणे जाशील पैल तीरी । अरे मना ॥२॥

आता करी दृढ भक्ती । यानेच पावशील मुक्ती ।
भक्ती म्हणजे जाण प्रीती । अरे प्राण्या ॥३॥

एक काय ते जाणोनि घ्यावे । तये ठायी प्रेम करावे ।
सुखानंद स्वरूपी भरावे । प्रेम भरे ॥४॥

एक म्हणजे नाही दोन । जेथे नुरे मी तू पण ।
जे का अनिर्वाच्य जाण । अविच्छिन्न ॥५॥

जेथे नुरे माया लेश । जेथे नुरे संशय लेश ।
जेथे पाहता प्रेम रस । वाहे अखंडीत अखंडत्वे ॥६॥

अखंड प्रसाद कीर्तन । जये ठायी रमते संतजन ।
तये ठायी प्रवेशता मन । जाण उन्मन होत असे ॥७॥

तरी प्रेममूर्ती भगवंतासी । ओळखोनी प्रेम करावे मानसी ।
जेणे योगे सिध्द ऋषी । तरोनि भगवद्रूप जाहले ॥८॥

जाणी हृदयस्थ परमेश्वर । तेथे नामी रंगोनी सत्वर ।
रंगोनि रंगी तदाकार । होवोनि श्रीरंग रुपी मिळावे ॥९॥

एक प्रेमाने नाम घ्यावे । एक प्रेमाने नाम गावे ।
तेणे योगे तरोनि जावे । भवसिंधु ॥१०॥

नाही याती नाही धर्म । करा अवघाची स्वधर्म ।
उच्चारावे राम नाम । सर्वकाळ आनंदे ॥११॥

योग नको याग नको । भोग नको त्याग नको ।
दान नको कर्म नको । धर्माधर्म नको पै ॥१२॥



अधर्माचरण नको । यात्रा नको व्रते नको ।
तपे नको कांही नको । स्मरा स्मरा राम राम ॥१३॥
आता हरी भक्ती धरा । उतराल पैलतीरा ।
करोनी कीर्तन पसारा । शारंगधरा आळवावे ॥१४॥

देवावरी करिता प्रीती । उभ्या राहतील भुक्ति मुक्ती ।
संसारी धरोनी अनासक्ती । रहाता बरे ॥१५॥

सावध व्हा अता तरी । गेले ते गेले भवपुरी ।
जपतू माळ अंतरी । रामकृष्ण ॥१६॥

भगवंती प्रेम जो करील । तोची भवसागरी तरेल ।
थोर कचाट्यातोनि सुटेल । चौऱ्यांशीच्या ॥१७॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
नामस्मरण महिमान निरुपण नाम । नवमः समासः ॥१८॥

॥ श्री गणेशायनमः ॥

आता ऐका श्रोते जन । सत्संगतीचे महीमान ।
जे श्रवण करिताची जन । पावन होती ॥१॥

साधूंचीच संगती धरावी । परी मूर्खाची मैत्री सोडोनि द्यावी ।
परी सद्गुरुंची आठवण धरावी । हे विसरु नका ॥२॥

अंतरीची वासना सांडावी । अंतःकरणी बुद्धी धरावी ।
सद्गुरुंची पाऊले चित्ती धरावी । हे विसरु नका ॥३॥

सद्गुरुंशी वादावाद करावा । अहंकार टाकोनि द्यावा ।
परी संसारासी त्यागावा । ठाई ठाई ॥४॥

रामप्रभू आठवावा । राम प्रभू नामी साठवावा ।
संसार जाळोनी टाकावा । हेची सत्य ॥५॥

नाम सत्य देव सत्य । येर सर्वची असत्य ।
ऐसे सांगती सद्गुरु समर्थ । सकळ जना कारणे ॥६॥



सद्गुरु पाशी बसावे । गुरुचरण पहावे ।
गुरुबरोबरी फिरावे । सर्वस्वी सद्गुरु ॥७॥

गुरुमुखातील शब्द । ते तो जाणावे की वेद ।
ऐसे पाहता हृद्गद । कळो येई ॥८॥

सद्गुरु मुखातील उच्चार । त्याचा करावा विचार ।
काढोनिया अन्य विचार । मनातील ॥९॥

सद्गुरुंचा लागे वारा । तोचि नेतो पैलतीरा ।
गुरुनी सांगितलेले स्मरा । वेळोवेळा ॥१०॥

ऐशी घडता सत्संगती । त्यासी आहे पुढे गती ।
नाही तरी पुढे घडगती । नाही नाही ॥११॥

इतीश्री राम दास बोधे । मनो मनासी संवादे ।
सत्संगती वर्णन निरुपण नाम । दशमः समासः ॥१२॥

॥ श्री गणेशायनमः ॥

आता ऐका श्रोते जन । देव कैसा आणी कोण ।
ज्याची घेता ओळखण । भवबंधन उरेना ॥१॥

जैशी वृक्ष आणी छाया । तथे परीच हे चांगया ।
देव वृक्ष जीव छाया । अरे मना ॥२॥

जेणे केले जग निर्माण । त्यासी नाठवील जो कोण ।
अधमाहीनी अधम जाण । जगी निंद्य ॥३॥

जो करील आठव । तो स्वयमेव देव ।
तेथे कैचा देहभाव । उरेचिना ॥४॥

भावे नाम जो घेईल । तोची संसारी तरेल ।
तेथे चित्त हरपेल । चैतन्य स्वरुपी ॥५॥

पुन्हा नाही जन्म मरण । जो करील स्मरण ।
ज्यासी आहे विस्मरण । त्यासी फेरा आहेची ॥६॥



जया जन्म तया मरण । जया मरण तया जनन ।
फळ आणि बीज जाण । तैशांपरी ॥७॥

बीज भाजले फळ नाही । फळ नसता बीज कैवी येई ।
तैशा परीच पाही । येथे असे ॥८॥

वासना नुरता जन्म नाही । जन्म नसता वासना नाही ।
जन्म मरण कैचे पाही । उरेल तेथे ॥९॥

भाव अवघाची देव । भाव विष्णू स्वयमेव ।
म्हणवोनी धरी दृढभाव । रामचरणी ॥१०॥

ऐसा दृढभाव धरी । भेटे वैकुंठ मुरारी ।
जपमाळ अढळधरी । रामकृष्ण ॥११॥

ऐसे करिता नामस्मरण । तेणे होसी तू पावन ।
माया निघे मनातून । वोखटीजे ॥१२॥

भावे हरीनाम घेसी । एक संता शरण जासी ।
तरी तुझिये भाग्यासी । पार नाही ॥१३॥

खरे जाणावे अंतस्थ । कधी न बसावे स्वस्थ ।
राम नाम गावे नित्य । हाची परमार्थ साधका ॥१४॥

जेव्हा धरिसी दृढभाव । तेंव्हा भेटे योगीराव ।
तरीच कळेल खरा ठाव । अंतरीचा ॥१५॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
मी कोण देव कोण हृद्गद वर्णन निरुपण नाम ।
एकादशः समासः ॥१६॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । मन कैसे करावे निर्वासन ।
तया संन्यस्त वृत्तीचे लक्षण । थोडक्यात वर्णन ॥१॥

संन्यास घेणे अति कठीण । नोहे काही सवघड जाण ।
अनासक्त वृत्तीचा बाण । हृदयी ठसला पाहिजे ॥२॥

ऐका संन्याशाचे लक्षण । जे का वर्णिती संतजन ।
सर्व त्यजोनी जीवन । संन्यास धरावा ॥३॥

ऐसा घेई रे संन्यास । करी सहांचा तू नाश ।
आणी धरु नको आस । जीवित्वाची ॥४॥

मायबाप म्हणसी त्यजिले । ते बरोबरी अंतरीचे सवेची नेले ।
मग तू काय त्यजिले । सांग नरा ॥५॥

भाऊ बहीण जरी त्यजिसी । अंतरीचे भाऊ बहीण सवेची नेतोसी ।
तरी काय तू त्यजिसी । अंतरीचे सर्व नेवोनी ॥६॥

जे त्यागावया नकी ते त्यागसी । ऐशी करणी करितोसी ।
टाकावेते बाळगतोसी । जाणबापा ॥७॥

तेथे प्रपंच मांडसी । जावोनीया वनासी ।
तरी तू कैसारे संन्यासी । जाण प्राण्या ॥८॥

बाह्य सर्व त्यागोनि जासी । अंतरीचे टाकिता नये तुजसी ।
नाम घेता अंतर वाचेसी । टाकिताते येईल ॥९॥

संन्यास मार्ग हा चुकला । भलत्याच मार्गी गेला ।
जेणे साधन मार्ग वा साधिला । तोचि भला जाणावा ॥१०॥

ऐसा नोहे रे संन्यास । निराळाचि आहे जाण मनास ।
श्वासोश्वासी प्रणवाभ्यास । तोची संन्यास जाणावा ॥११॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
संन्यस्त वृत्ति निरुपणं नाम । द्वादशः समासः ॥१२॥



॥ श्री गणेशायनमः ॥
आता ऐका श्रोते जन । पुनः संन्यस्त वृत्तीचे लक्षण ।
जेणे योगे समाधान । अंतरी होय ॥१॥

मागचे समासीचे स्पष्टीकरण । ऐका अंतःकरणपूर्वक जाण ।
अंतरी सावध होऊन । जाण पै गा ॥२॥

माय बाप हे कोणते । अहंकार अविद्या जाणते ।
जे त्यागावयाचि ते । अंतरीचे नेसी बरोबरी ॥३॥

आता ऐका भाऊबहीण । संकल्प विकल्प आशा मनीशा जाण ।
त्यासी त्यागावे अवधान ठेवून । विचारेनी ॥४॥

बायको जाणावी वासना । हे सवेचि नेसी मना ।
तरी कैसा संन्याशी जाणा । होशील बापा ॥५॥

जरी त्यजिले घरदार । तरी बरोबर नेसी हे शरीर ।
हेची त्यजावया पाहिजे घर । ते सद्गुरु वाचोनी त्यजिता येईना ॥६॥

जरी दशेंद्रिये त्यजीसी । तरीच होशील संन्यासी ।
आधी होईजे प्रणवाभ्यासी । गुरुकृपे ॥७॥

आशा मनीशा वासना । त्यजणे संन्यस्त वृत्तीच्या खुणा ।
भुली इच्छा काम नाना । त्यजीमा पै ॥८॥

काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह त्यजील जो नर ।
तोची तरेल भवसागर । अरे मना ॥९॥

ऐसा त्याग न करिसी । तरी तू वरकरणी संन्यासी ।
धर्म नेणोनी अधर्म करिसी । ढोंग पै गा ॥१०॥

येथे राम दास बोध ग्रंथ जाण । करीत असे मी संपूर्ण ।
वंदोनीया श्रीगुरुचरण । करोनी अर्पण सद्गुरुसी ॥११॥

सद्गुरुंची करणी अगाध । म्हणोनी मम वाचे राम दास बोध ।
माझे वयाचे नववे वर्षी अगाध । सद्गुरुंनी प्रगटविला ॥१२॥



मम माता इंदिराबाई । तिसी वंदोनिया पाही ।
माथा ठेविती लवलाई । मम पितयांचे चरणावरी ॥१३॥

गोविंद अनंत केळकर । ऐसे मम पितयांचे नाम साचार ।
त्यांचे बालक मी राम गोविंद केळकर । नमन करी साष्टांगे॥१४॥

माता पित्यासी वंदोन । ग्रंथ रचना संपविली जाण ।
सद्गुरुंचे बोधामृत जाण । सद्गुरु चरणी समर्पिती ॥१५॥

इतीश्री राम दास बोधे । मनोमानसी संवादे ।
संन्यस्त वृत्ति निरुपणंनाम । त्रयोदशः समासः ॥१६॥

गुरुदास गणेशकृत राम दास बोध ग्रंथ महात्म्य सुमन-

श्री गणेशायनमः

आता ऐका श्रोतेजन । राम दास बोध ग्रंथाची हकिकत पूर्ण ।
अमोल हृद्‌गत वर्णन । अंतरीचे ॥१॥

नववे वर्षी कृपा करोनी रामावरी । तयासी बोध केला अंतरी निर्धारी ।
तोचि त्याने बहुकुसरी । प्रगट केला ॥२॥

संतोषली गुरु माऊली । जाणोनी रामाची अंतर खोली ।
सेवा करवोनी घेतली । गुरुबोध ठेवा दिधलासे ॥३॥

तैसीचि या अर्भका करवी । सेवा करवोनी घेतली बरवी ।
जेणे आचरीता मिळे मोक्ष पदवी । तेचि लिहिण्यासी दिधलेसे ॥४॥

सुंदर अक्षर म्हणोन । लिहिण्यास दिला ग्रंथ जाण ।
ऐसे गुरुकृपेचे महिमान । अघटीत असे ॥५॥

एकोणीशे तीसात ग्रंथ झाला । तो सदतीसात सुबक लिहीला ।
ऐसा हा योगायोग भला । थोर असे ॥६॥

एकोणिशे एकतीसात । ग्रंथ झालासे गुप्त ।
शोधोनी थकले समस्त । परी तो सापडला नसे कीं ॥७॥

योगायोग अपूर्व जाणा । संशय विरहीत सांगतो खूण ।
एकोणीशे सदतीसात ग्रंथ धन्य । पौष मासी सापडला ॥८॥

व्यवस्थित लिहिण्यासी । द्यावा जाणावे मजसी ।
असे वाटोनि रामासी । तेणे मज लागी दिधलासे ॥९॥

मी गणेश धोंडो कानिटकर । त्या सद्‌गुरुसी करितो नमस्कार ।
जेणे अपूर्व योग आणिला सुंदर । अमोलिक जाणावा ॥१०॥

इति श्री गणेश कृत । राम-दास बोध ।
ग्रंथ महात्म्य सुमननाम । अर्पणः समासः




मुद्रणस्थळ :
प्राजक्त प्रिंटिंग प्रेस
मारुती रोड, सांगली ४१६४१६

प्रकाशक :
श्री. बजरंग रामराव हडदरे
९५९/क, खणभाग, सांगली ४१६४१६

प्राप्तीस्थान :
श्री. चंद्रशेखर राम केळकर
'श्रीराम निकेतन', श्री. बापूराव केळकर वाडा,
सेना मंदिर रोड, गांवभाग, सांगली ४१६४१६

## सांप्रदायाची आरती

आरती सांप्रदाया । प्रेमभावे वंदूनीया ।
ओवाळीन संतराया । विनवीनी सदया ॥ धृ ॥

अगाध काडसिद्धा । शिवस्वरूप प्रसिद्धा ।
माया ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा ॥ १ ॥

जयजया नारायणा । जीवीचिया जीवना ।
साकार ब्रह्मतनू । गुरुलिंगा निधाना ॥ २ ॥

लक्ष्मुमी आक्का भली । आदिशक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ॥ ३ ॥

रघुनाथ प्रिय साधु । गुरुआज्ञे करु बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्य सिंधू ॥ ४ ॥

धन्य धन्य रामचंद्र । महाविष्णू अवतार ।
साधन सांप्रदाय । गुरुभक्ती बडीवार ॥ ५ ॥

नारायण गुरुपीठ । हनुमंत वरिष्ठ ।
गोविंदसुत रामी । नामावली चोखट ॥ ६ ॥

श्री दासराम महाराज